# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे

आयएस्ओ ९००१:२००८ मानांकित संस्था

# कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांसाठी
# कृषी पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१७-१८


१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे – ४११ ००७

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

दूरध्वनी : (०२०) २५५३७६८८.
फॅक्स : (०२०) २५५३३७६४.

वेबसाईट : www.mcaer.org



दि. १५ मे,२०१७ रोजी प्रकाशित. दि.१९/७/२०१७ रोजी अद्ययावत.


(प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.)

## महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे-४११ ००७.
### आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

| पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम सी. विद्यासागर राव | ०२२-२३६३२६६० | ०२२-२३६३३२७२ |
| कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य,<br>प्रति-कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा.श्री. पांडुरंग फुंडकर | ०२२-२२०२५०१४ | ०२२-२२०२४८७३ |
| उपाध्यक्ष | मा. डॉ. राम खर्चे | ०२०-२५५३७४८१ | ०२०- २५५३३७६४ |
| महासंचालक | डॉ. के. एम. नागरगोजे | ०२०-२५५३७२५७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (शिक्षण) | डॉ. श्रीकांत काकडे | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| संचालक (विस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३४५७७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (संशोधन) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| सहसंचालक (प्रशासन) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०-२५५३१२०८ | ०२०-२५५३३७६४ |
| सहसंचालक (वित्त) | श्री. गणेश पाटील | ०२०- २५५३२७२६ | ०२०- २५५३३७६४ |
| **संकेतस्थळे:** www.mcaer.org & maha-agriadmission.in, **email:** mcaer@rediffmail.com,edn_mcaer@rediffmail.com | | | |

### महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ४१३ ७२२ जि. अहमदनगर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. के. पी. विश्वनाथा | ०२४२६-२४३२०८ | ०२४२६-२४३३०२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. भि. रा. उल्मेक | ०२४२६-२४३२२७ | ०२४२६-२४३२२७ |
| ३ | कुलसचिव | श्री. ग. का. घोरपडे | ०२४२६-२४३२१६ | ०२४२६-२४३२१६ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. रा. ध. पाटील | ०२४२६-२४३२१५ | ०२४२६-२४३२१६ |

**संकेतस्थळ:** mpkv.mah.nic.in **email:** dracdmpkv2013@rediffmail.com

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४ १०४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. र. गो. दाणी | ०७२४-२२५८३६५ | ०७२४-२२५८२१९ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८०९३ | ०७२४-२२५८०९३ |
| ३ | कुलसचिव | डॉ. श्री. के. अहेरकर | ०७२४-२२५८३७२ | ०७२४-२२५८३७२ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. श्री. के. अहेरकर | ०७२४-२२५८३४८ | ०७२४-२२५८३४८ |

**संकेतस्थळ:** www.pdkv.ac.in **email :-** dyracad@pdkv.ac.in

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ४३१ ४०२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. बी. व्यंकटेश्वरलू | ०२४५२-२२३००२ | ०२४५२-२२३५८२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. अ. श्री. ढवण | ०२४५२-२२२६८७ | ०२४५२-२२२६८७ |
| ३ | कुलसचिव | श्री. वि. द. पाटील | ०२४५२-२२९७५५ | ०२४५२-२२९७५५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. ह. लि. भांगे | ०२४५२-२२७९०० | ०२४५२-२२७९०० |

**संकेतस्थळ:** mkv2.mah.nic.in **email:** reg_mau@rediffmail.com

### डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. तपस भट्टाचार्य | ०२३५८-२८२०६४ | ०२३५८-२८२०७४ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. र. ग. बुरटे | ०२३५८-२८४३०८ | ०२३५८-२८४३०८ |
| ३ | कुलसचिव | डॉ. एस. एस. नारखेडे | ०२३५८-२८२०६५ | ०२३५८-२८३०६५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. अनिल पवार | ०२३५८-२८२४११<br>विस्तार १२५ | ०२३५८-२८३९६३ |

**संकेतस्थळ:** www.dbskkv.org **email:** regrdbskkv@rediffmail.com

# महाराष्ट्र राज्यातील कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांसाठी कृषी पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१७-१८

**१. प्रस्तावना :**

१.१ **महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद)** ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, **अधिनियम, १९८३ चे कलम १२** अंतर्गत स्थापन झालेली **वैधानिक संस्था** आहे. **उक्त अधिनियमाच्या कलम १२ उपकलम ३ (जी) मधील तरतुदीनुसार कृषी परिषदेला प्राधिकृत करण्यात आल्यानुसार** राज्यातील कृषी विद्यापीठांमधील विविध पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी सामायिक नियमावली तयार करण्यात आली आहे.

१.२ शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ (**परिशिष्ट-'अे'**) अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित केली आहे. (१) नवीन शासकीय महाविद्यालये, शासकीय अनुदानित महाविद्यालये आणि विना अनुदानित महाविद्यालये सुरु करण्यास, (२) केंद्रीय प्रवेश प्रक्रिया विहित करण्यास व राबविण्यास (३) प्रवेशाकरिता अधिभार निश्चित करण्यास, प्रवेश करण्यास आणि (४) चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क ठरविण्यास कृषी परिषदेला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

१.३ शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृप २०१२ / प्र.क्र.१०३ / ७ अे, दि.१८/६/२०१५ (**परिशिष्ट 'बी'**) अन्वये कृषी तंत्र निकेतन उत्तीर्ण असलेले उमेदवार कृषी पदवी [B.Sc. (Agri.)] अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आलेले असून थेट दुसऱ्या वर्षातही विहित किमान गुणांच्या अटीवर प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत.

१.४ कृषी परिषदेच्या दि.२२/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या ८८ व्या बैठकीतील विषय क्र.१२ अन्वये मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. ('केटीपीएल'), पुणे यांच्यावर सामायिक प्रवेश प्रक्रिया **'ऑनलाईन पध्दती'**ने राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## १.५ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र

| अ. क्र. | कृषी विद्यापीठाचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी-४१३ ७२२, जि. अहमदनगर **(मफुकृवि - राहुरी)** | **अहमदनगर**, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २ | **डॉ. प**ंजाबराव **दे**शमुख **कृ**षी **वि**द्यापीठ, अकोला-४४४ १०४. **(डॉ.पंदेकृवि - अकोला)** | **अकोला,** अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर |
| ३ | **व**संतराव **ना**ईक **म**राठवाडा **कृ**षी **वि**द्यापीठ, परभणी-४३१ ४०२. **(वनामकृवि - परभणी)** | **परभणी,** हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना व औरंगाबाद. |
| ४ | **डॉ. बा**ळासाहेब **सा**वंत **कों**कण **कृ**षी **वि**द्यापीठ, दापोली-४१५ ७१२. जि. रत्नागिरी **(डॉ. बासाकोकृवि - दापोली)** | **रत्नागिरी,** सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर. |

## १.६ व्याख्या :

### १.६.१. विद्यापीठ कोटा ['U' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय / शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे, आणि संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संस्थेतून कृषी तंत्र निकेतन पदविका उत्तीर्ण आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'विद्यापीठ कोटा' ['U' Quota]** असे संबोधण्यात यावे.

### १.६.२ महाराष्ट्र कोटा ['M' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय / शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. अशा

उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'महाराष्ट्र कोटा'** **['M' Quota]** असे संबोधण्यात यावे. यास्तव विद्यापीठ कोटयातील उमेदवार महाराष्ट्र कोटयाकरितासुध्दा पात्र आहेत.

### १.६.३ जागेवर प्रवेश [Spot Admission]

नियोजित ऑनलाईन प्रवेश फे-या संपल्यानंतर रिक्त झालेल्या / असलेल्या जागांवर प्रवेश मिळण्यासाठी 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा'त उमेदवाराने प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि उपस्थित उमेदवारांमधून आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याच्या प्रक्रियेस **'जागेवर प्रवेश'** **[Spot Admission]** असे संबोधण्यात यावे. **जागेवर प्रवेशासाठीच्या प्रक्रियेच्यावेळी अनुपस्थित असलेला उमेदवार 'जागेवर प्रवेशा'साठी पात्र ठरणार नाही.**

## २. संस्था व पदवी अभ्यासक्रमांचा तपशील :

परिच्छेद २.१ येथे नमूद करण्यात आलेल्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ (**'यु' कोटा**) व महाराष्ट्र (**'एम्' कोटा**) कोटयाकरिता इच्छुक उमेदवारांनी **संकेतस्थळावर एकच प्रवेश अर्ज दाखल करावा.**

**पदवी अभ्यासक्रम व परीक्षेचे माध्यम इंग्रजी राहील.**

### २.१ पदवी अभ्यासक्रम, कालावधी, गुणांक भार आणि पात्रता :

| पदवी अभ्यासक्रम | कालावधी | श्रेयांक भार | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| **पहिल्या वर्षासाठी** | | | |
| बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) | ४ वर्षे (८ सत्रे) | १८३ | कृषी तंत्र निकेतन (Agril. Polytechnic) उत्तीर्ण. |
| **दुसऱ्या वर्षासाठी** | | | |
| बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) | ३ वर्षे (६ सत्रे) | १८३ | कृषी तंत्र निकेतन (Agril. Polytechnic) (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणांसह) उत्तीर्ण. |

**टीपः-**

१. कृषी तंत्र निकेतन (Agril. Polytechnic) पदविकाधारकांना आवश्यकतेनुसार कमतरता विषय पूर्ण करण्याविषयी घेण्यात येणारे निर्णय बंधनकारक राहतील.

२. वाढीव श्रेयांक भार विहित कालावधीत शक्य न झाल्यास आणि त्यामुळे जास्तीचे सत्राची आवश्यकता लागल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची असेल.

## २.२ कृषी पदवी अभ्यासक्रमाची घटक/अनुदानित महाविद्यालयनिहाय प्रवेश क्षमता व इतर तपशील.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| १. | कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५. | ११००१ | मफुकृवि | १९० | १९ | ३८ | श्री. सय्यद सिकंदर एजाज | ०२०-२५५३७०३३<br>२५५३७६८३<br>९४२२०२५९३५<br>फॅक्स-२५५३७१८८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २. | कृषी महाविद्यालय, जुना पुणे-बंगलोर रस्ता, राजाराम महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठाजवळ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४. | ११००२ | मफुकृवि | १९० | १९ | ३८ | डॉ. जी. जी. खोत | ०२३१-२६०६२५६<br>फॅक्स-२६०६२५६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३. | कृषी महाविद्यालय, परोळा रस्ता, धुळे ४२४ १०४. | ११००३ | मफुकृवि | १२८ | १३ | २६ | डॉ. पी. एन. रसाळ | ०२५६२-२३०३६८,<br>७५८८०३६३८८<br>फॅक्स- २३०१२७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ४. | कृषी महाविद्यालय, धुळे रोड, नंदूरबार ४२५ ४१२. | १११६ | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. पी. एन. रसाळ | ०२५६४-२०२२८२<br>७५८८०३६३८८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| (१) | यशवंतराव चव्हाण कृषी महाविद्यालय, पोस्ट बॉक्स क्र.८०, कराड, जि.सातारा. | ११२८५ | मफुकृवि | ६० | ६ | १२ | श्रीमती एम. व्ही. पाटील | ०२१६४-२५५५४२<br>२५५५४४<br>९८२२५४५६०० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५. | कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव | ११२९८ | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. जी. के. ससाणे | ०२५८३-२३४२२०<br>९४२३५२३२४६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ६. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय हाळगांव, ता. जामखेड, जि. अहमदनगर (सध्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत.) | ११३०१ | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. व्ही. डी. शेंडे | ९४०४११४४३९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ७. | कृषी महाविद्यालय, अकोला ४४४ १०४. | १११०४ | डॉ.पंदेकृवि | ११२ | ११ | २२ | डॉ. एस. पी. लांबे | ०७२४-२२५९११७<br>९०११०२८११५<br>फॅक्स- २२५८०९१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ८. | कृषी महाविद्यालय, नागपूर ४४४ ००१. | १११०५ | डॉ.पंदेकृवि | १७२ | १७ | ३४ | डॉ. अनिल पिंपळे | ०७१२-२५२०७२१<br>९४२३१२१६८<br>फॅक्स-२५५४८२० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ९. | कृषी महाविद्यालय, सोनापूर, गडचिरोली ४४२ ६०५. | १११०६ | डॉ.पंदेकृवि | ६४ | ६ | १३ | डॉ. आर. एस. वाघमारे | ०७१३२-२२३०६१<br>९४२३६५९००१<br>फॅक्स- २२३०६२ | नाही | नाही |
| १०. | श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती ४४४ ४०३. | १११०७ | डॉ.पंदेकृवि | १५६ | १६ | ३१ | श्री. ए. एम. बंड | ०७२१-२६६४५९५<br>९४२२५४३४१९<br>फॅक्स- २६६४५९५ | आहे (मर्यादित) | नाही |
| ११. | आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा जि.चंद्रपूर ४४२ ९१४. | १११०८ | डॉ.पंदेकृवि | ८८ | ९ | १८ | श्री. आर. एस. रहाटे | ०७१७६-२८२१५८<br>९४२०१५६६९०<br>फॅक्स- २८२१३४ | नाही | नाही |
| १२. | कृषी महाविद्यालय, कृषी नगर, परभणी ४३१ ४०२. | १११०९ | वनामकृवि | २१० | २१ | ४२ | प्रा. एन.जी. लाड | ०२४५२-२३३००७,<br>७५८८०८२०८८<br>फॅक्स- २३३००७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| १३. | कृषी महाविद्यालय,<br>नांदेड रोड, लातूर ४१३ ५१२. | ११११० | वनामकृवि | ९४ | ९ | १९ | डॉ. एस. एस. शेटगार | ०२३८२-२५६१२८<br>९४२१३७४१८१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १४. | कृषी महाविद्यालय,<br>बदनापूर जि.जालना ४३१ २०३. | ११११९ | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. जी. एम. वाघमारे | ०२४८२-२६१०३४<br>७५८८५३७६९६<br>फॅक्स- २६१०३४ | नाही | आहे (मर्यादित) |
| १५. | कृषी महाविद्यालय,<br>अंबेजोगाई जि. बीड ४३१ ५१७. | १११९२ | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. एस. जी. बोरकर | ०२४४६-२४५१४१<br>९४२२७५७४०६<br>फॅक्स- २४५१४१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १६. | कृषी महाविद्यालय, उस्मानाबाद<br>किनी, उस्मानाबाद तेर रोड,<br>ता.जि.उस्मानाबाद. | १११९३ | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. के. आर. कांबळे | ०२४७२-२२८१२६<br>९४२१३२५५७५<br>फॅक्स- २२८१२६ | नाही | नाही |
| १७. | कृषी महाविद्यालय,<br>गोळेगाव,<br>ता.औंढा (नागनाथ), जि.हिंगोली | १११९५ | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. जी. ए. भालेकर | ९४०४४६४९०० | नाही | नाही |
| १८. | कृषी महाविद्यालय,<br>दापोली ४१५ ७१२. | १११९४ | डॉ.बासाको कृवि | १२८ | १३ | २६ | डॉ. व्ही. जी. नाईक | ०२३५८-२८२१०८<br>७०५७६७८६७८<br>फॅक्स-२८२१०८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | **एकूण** | | | **२०१२** | २०१ | ४०३ | | | | |

## २.३ कृषी पदवी अभ्यासक्रमाची विना अनुदानित (कायमस्वरूपी) महाविद्यालयनिहाय प्रवेश क्षमता व इतर तपशील.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| १. | कृषी महाविद्यालय, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर ४१३ १०१. | ११२९ | ब | मफुकृवि | १२० | १२ | २४ | प्रा. आर. जी. नलावडे | ०२१८५-२२७१९१ ९८६०८७५७२९ फॅक्स- २२२४७६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २. | डॉ.अप्पासाहेब पवार कृषी महाविद्यालय, मु.पो. शारदानगर, ता. बारामती जि. पुणे ४११ ११५ . | ११३० | अ (२०१३-१४ व २०१४-१५) | मफुकृवि | १८० | १८ | ३६ | प्रा. एन्. ए. नलावडे | ०२११२-२५५५१८ ९८५०५२११५२ फॅक्स- २५५५१८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३. | लोकनेते मोहनराव कदम कृषी महाविद्यालय, सोनसळ, हिंगणगाव, ता. कडेगाव जि. सांगली ४१५३०३. | ११३१ | क (२०१३-१४) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ.डी.एम. सावंत | ०२३४७-२४२७०० ९३७१६९००१५ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ४. | कृषी महाविद्यालय, उदोजी मराठा बोर्डिंग कॅम्पस, गंगापूर रोड, नाशिक ४२२०१३. | ११३२ | क (२०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. आय. बी. चव्हाण | ०२५३-२५७७५३६ ८८८८९३५८६ फॅक्स- २३१७७८१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५. | कृषी महाविद्यालय, सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर ४१४ १०५. | ११३४ | अ (२०१४-१५) | मफुकृवि | १८० | १८ | २४ | डॉ. एच. जी. मोरे | ०२४२७-२३१७६९ ९८५०५३७६७० फॅक्स- २३१७६९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ६. | के.के.वाघ कृषी महाविद्यालय, सरस्वतीनगर, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. | ११३५ | ब (२०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. एस. एम. हडोळे | ०२५३-२३०३५४५<br>९४२२५३४२२८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ७. | कृषी महाविद्यालय, राजमाची, ता. कराड जि.सातारा ४१५ ११०. | ११३६ | क | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. एस. एम. शिंदे | ०२१६४-२०००२५<br>९९२१४४३०२९<br>फॅक्स- २७१४०० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ८. | डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालय, डॉ. उल्हास पाटील नगर, ॲडीशनल एम.आय. डी.सी., भुसावळ रोड, जळगाव ४२५३०९. | ११३७ | ब | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ.एस.एम. पाटील | ०२५७-२२००८२९<br>९३२६५१२७४३<br>फॅक्स- २२७०३३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ९. | वसंत दादा पाटील कृषी महाविद्यालय, आंबी, ता. मावळ जि.पुणे ४१०५०६. | ११३८ | ब | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ.एस.एस. भगत | ०२११४-२२२५२३<br>९८६००५५०१०<br>फॅक्स- २८१०१० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १०. | कृषी महाविद्यालय, पूज्य सानेगुरूजी विद्या प्रसारक मंडळ, शहादा जि.नंदूरबार ४२५ ४०९. | ११३९ | ब (२०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | प्रा.एस.एल. पाटील | ०२५६५-२२९५६२<br>९४२३२५८०२४<br>फॅक्स- २२९७४० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ११. | लोकमंगल कृषी महाविद्यालय, मु. पो. वडाळा ता. उत्तर सोलापूर जि.सोलापूर ४१३२२२. | ११९४० | ब | मफुकृवि | १२० | १२ | २४ | प्रा.एस.एस. कारंडे | ०२१७-२७३५५२१ ९९२३४०४६९१ फॅक्स- २२४६४६८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १२. | कृषी महाविद्यालय, मु.पो.तळसंदे, ता.हतकणंगले जि.कोल्हापूर ४१३ ११२. | ११९४१ | ब | मफुकृवि | १२० | १२ | २४ | प्रा. एस. बी. पाटील | ०२३०-२४७९२९९ ९८२३३८११९१ फॅक्स- २४७९२९९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १३. | कृषी महाविद्यालय, जिंती नाक्याजवळ, पुणे रोड, मु.पो. ता. फलटन जि.सातारा ४१५ ५२३. | ११२०५ | ब (२०१३-१४ व २०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ.एस.बी. शिंदे | ०२१६६-२२५३५२ ९८९०५६५४४४ फॅक्स- २२५३५२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १४. | कृषी महाविद्यालय, जळोद रोड, रेल्वे क्रॉसिंगजवळ, अंमळनेर जि. जळगाव ४२५४०१. | ११२०६ | ड (२०१४-१५) | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. इ. एन. पाटील | ०२५८७-२०२५०१ ९८८१३३२७८८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १५. | श्रमशक्ती कृषी महाविद्यालय, मु.मालदाड ता. संगमनेर जि.अहमदनगर ४२२ ६०८. | ११२०७ | अ (२०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. ए. एल. हारदे | ०२४२५-२६५०९२ ९७६६२००२०१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १६. | सद्‌गुरु कृषी महाविद्यालय, मिरजगांव, (टोल नाक्याजवळ) ता.कर्जत जि.अहमदनगर ४१४४०१. | ११२०८ | ब (२०१४-१५) | मफुकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. आर. के. बिटे | ०२४८९-२६३८५३ ७७२२०५३५०३ फॅक्स- २६३१५३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| १७. | कृषी महाविद्यालय, दोंडाईचा, ता. सिंदखेड, जि.धुळे ४२५ ४०८ | ११२६३ | ब (२०१४-१५) | मफुकृवि | १८० | १८ | ३६ | डॉ.डी.आर. पाटील | ०२५६६-२४४२२५ ९४२२३७००९९ फॅक्स- २४५०९३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १८. | कृषी महाविद्यालय, बाभुळगाव, ता.येवला, जि.नाशिक | ११२८० | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. एस. ए. राऊत | ०२५५९-२०५०४० ९८६०८१२५५५ फॅक्स- २०५०४० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| १९. | कृषी महाविद्यालय, प्रवरा नगर, लोणी, ता.रहाता, जि.अहमदनगर | ११२८१ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | प्रा. एन. एम. दळे | ०२४२२-२७२७९४, ९४२३७८७४१४ फॅक्स- २७२७९२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २०. | कृषी महाविद्यालय, घारगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | ११२८२ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. के. एच. निंबाळकर | ०२४८७-२७२५२५ ९९२१४७५५५५ फॅक्स- २७२५२५ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २१. | शरद कृषी महाविद्यालय, जैनापूर, ता.शिरोळ जि.कोल्हापूर ४१६१०१. | ११२८३ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. एस. सी. पाटील | ०२३२२-३२६११० ९८६०९९९४९५ फॅक्स- २५२८९७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २२. | कृषी महाविद्यालय, मु.पो. पानीव ता.माळशिरस जि.सोलापूर ४१३ ११३ | ११२८४ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | श्री. ए. एम. शेख | ०२१८५-२७४१११ ९४२२६५२४१४ फॅक्स- २७४२४४ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २३. | कृषी महाविद्यालय, वडगाव गुप्ता (विळद घाट) पो.एमआयडीसी, जि.अहमदनगर | ११२८७ | उपलब्ध नाही | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. एस. एन. माटे | ०२४१-२३२७१८० ८५५४९९०२३६ फॅक्स- २३२७१८० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| २४. | रोशनजी शमनजी कृषी महाविद्यालय, नेसरी ता.गडहिंग्लज जि.कोल्हापूर, | ११२९१ | २०१४-१५ पासून सुरु | मफुकृवि | ६० | ६ | १२ | श्री. आर. एन. शमनजी | ०२३२७-२०२०३६<br>९८६९५६०१३७<br>फॅक्स-२०२०३६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २५. | कृषी महाविद्यालय, मालेगाव, जि.नाशिक ४२३१०५. | ११२९२ | २०१४-१५ पासून सुरु | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. व्ही. एस. पवार | ०२५५४-२५००३८<br>७७२००२०७५०<br>फॅक्स- २५२५६३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २६. | कृषी महाविद्यालय, भानसहिवरा, ता. नेवासा जि.अहमदनगर | ११२९७ | २०१५-१६ पासून सुरु | मफुकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. अे.आर.ढगे | ०२४२७२५२१९९<br>८३७८०५५८१९<br>फॅक्स - २५२१९९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २७. | कृषी महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ ४४५२०२. | १११४३ | ब २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री.एन.व्ही. जोशी | ०७२३८-२५५७७४<br>९४२२८०१७१९<br>फॅक्स- २५५७७४ | नाही | नाही |
| २८. | विवेकानंद कृषी महाविद्यालय, विवेकानंद नगर (हिवरा आश्रम), ता. मेहकर जि.बुलडाणा ४४३३०१. | १११४४ | अ २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. ए. एल्. सारडा | ०७२६८-२६४४७२<br>९४२३४३१९६७<br>फॅक्स- २६४४८७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| २९. | स्वातंत्र्यवीर गणपतराव इंगळे कृषी महाविद्यालय, जळगाव जामोद, जि. बुलडाणा ४४३ ४०२. | १११४५ | ब २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. वाय. आर. गवई | ०७२६६-२२४२३१<br>९८६०३३१६६६<br>९८६०३३१६६९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ३०. | रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय, पिप्री, वर्धा ४४२ ००१. | १११४६ | अ २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२०* | १२ | २४ | डॉ.एस.एन. कुलकर्णी | ०७१५२-२३१८४०, ९४२१९६८६८८ फॅक्स- २३०५०६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३१. | मारोतराव वादाफळे कृषी महाविद्यालय, गुरुनानक नगर, गोधनी रोड, यवतमाळ ४४५ ००१. | १११४७ | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. व्ही. एम. कडू | ०७२३२-२४४९२५ ९४२१७७४२०९ फॅक्स- २४५४८४ | नाही | नाही |
| ३२. | डॉ. राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालय, जुना अजीसपूर रोड, बुलडाणा ४४३ ००१. | १११४८ | ब २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. शरद पवार | ०७२६२-२८७२११ ९६४३२५६०६० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३३. | श्री संत शंकर महाराज कृषी महाविद्यालय, पिंपळखुटा, जि.अमरावती ४४४ ७०९. | ११९४९ | अ २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. व्ही. व्ही. डहाके | ०७२२२-२३११११ ९८९०८९००८४ फॅक्स- २३११११ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३४. | स्व. आर.जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा जि.अमरावती | १११५० | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | प्रा. ए. जी. सरनाईक | ०७२२५-२७७४७९ ९८२३३४२२९३ | नाही | नाही |
| ३५. | श्री समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगांव राजा, जि.बुलडाणा ४४३ २०४. | १११५१ | अ २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | प्रा. ए. डी. हरणे | ०७२६१-२२२२६ ९८२२०१०१२८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ३६. | सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय, बोडणा, ता.जि.अमरावती | ११२५० | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. विनय चौधरी | ०७२१-२६६११९९ ८८८८१८४७७१ | नाही | नाही |
| ३७. | मनोहरभाई पटेल कृषी महाविद्यालय, हिराटोला, कालीमाटी, ता.गोरेगाव, जि.गोंदिया ४४१८०१. | ११२४८ | क २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. एस. बी. डोंगरे | ०७१८७-२०२०३५ ८००७८२००२० फॅक्स- २०२०३४ | नाही | नाही |
| ३८. | श्री. सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा वाघ, ता लाखणी, जि.भंडारा | ११२६० | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. प्रवीण बिसणे | ०७१८६-२४६२४४ ८३७९८७१४९३ फॅक्स- २४६२४४ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ३९. | कृषी महाविद्यालय, उमरखेड, ता. उमरखेड, जि.यवतमाळ | ११२६१ | क २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. जे. एन. पोहरे | ०७२३१-२३७१६६ ८१८००४२४८० फॅक्स- ०७२४-२४५५७८४ | नाही | नाही |
| ४०. | कृषी महाविद्यालय, शिर्ला अंधारे, ता.पातूर, जि.अकोला | ११२६५ | ड २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. जी. डी. आगरकर | ९८२२५७०१७५ | नाही | नाही |
| ४१. | कृषी महाविद्यालय, रिसोड, जि.वाशिम | ११२७१ | क २०१६-१७ | डॉ.पंदेकृवि | १२० | १२ | २४ | श्री. आर. बी. साबळे | ०७२५१-२२६५६० ८८०५८८६४९४ फॅक्स-२२६५६० | आहे (मर्यादित) | नाही |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ४२. | श्रीमती अनुसयाबाई मेघे कृषी महाविद्यालय, भुगाव ता. जि. वर्धा | ११२८८ | २०१४-१५ पासून सुरु | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. ए. ए. टाले | ०७१५२-२४४५२३ ७७९८१५७६१९ | नाही | नाही |
| ४३. | कृषी महाविद्यालय, कोंघारा, पो.पिपरी ता.केळापूर जि.यवतमाळ | ११२९४ | २०१५-१६ पासून सुरु | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. ए. व्ही. तातेवार | ९८९०७५०१६० | नाही | नाही |
| ४४. | केवलरामजी हरडे कृषी महाविद्यालय, चामोर्शी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली | ११२९५ | २०१५-१६ पासून सुरु | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. बी. बी. कुमारे | ०७१३५-२३५२७६ ९४०४२२१३८७ | नाही | नाही |
| ४५. | कृषी महाविद्यालय, आमखेडा ता. मालेगाव, जि.वाशिम | ११२९६ | २०१५-१६ पासून सुरु | डॉ.पंदेकृवि | ६० | ६ | १२ | श्री. डब्ल्यु. के. मैसाने | ७०२५४२१७०५१ ९४२३१२४५९५ फॅक्स- ७०२५४२१७०५२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ४६. | आदित्य कृषी महाविद्यालय, तेलगाव रोड, बीड ४३१ १२२. | ११९५२ | ड (२०१५-१६) | वनामकृवि | १८० | १८ | ३६ | डॉ. अरूण मुंडे | ०२४४२-२३११९९ ९४२२२४१६०९ फॅक्स- २२७०६१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ४७. | दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव ता.वैजापूर जि.औरगांबाद ४२३ ७०३. | ११९५३ | क (२०१७-१८) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. बामडे | ०२४३६-२८७४८० ७०३८३९४३०५ फॅक्स- २८७४८० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ४८. | कृषी महाविद्यालय, नायगाव बाजार ता.नायगाव जि.नांदेड ४३१ ७०९. | ११९५४ | अ (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. यु. जी. कुलकर्णी | ९८५०१२८७७९ ०२४६५-२६२८०० | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ४९. | कै. राजीव गांधी कृषी महाविद्यालय, जिंतूर रोड, परभणी ४३१ ४०१. | ११९५५ | ब (२०१६-१७) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | प्रा. एन. आर. खान | ०२४५२-२३२२०१ ९८९०९१८३८९ फॅक्स- २३२२०१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५०. | श्री छत्रपती, शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय, आष्टी, जि. बीड ४३१ १२२. | ११९५६ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | श्री. डी. झेड. जगताप | ७५८८६९४८८५ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५१. | सीएसएमएसएस कृषी महाविद्यालय, कांचनवाडी, पैठण रोड, ता. जि.औरगांबाद ४३१ ०११. | ११९५७ | अ (२०१५-१६) | वनामकृवि | १८० | १८ | २४ | प्रा. ए.व्ही जाधव | ०२४०-६६४६२५१ ८८०५०१०६९९ फॅक्स- ६६४६२२२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५२. | एसडीएमव्हीएम कृषी महाविद्यालय, गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद ४३१ ००३. | ११९५८ | ब (२०१६-१७) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | श्री आर.जी. भालकर | ०२४०-२४८०४५१, ९८९०७३४५७४ फॅक्स- २४८०४५१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५३. | कृषी महाविद्यालय, महाजन कॉम्प्लेक्स, नांदेड नाका, नांदेड रोड, मु.पो.ता.उदगीर जि.लातूर ४३१ ५१७. | ११९५९ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. एस. बी. रोहिदास | ०२४६६-२२४४५५ ८६००६७९२४८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५४. | कृषी महाविद्यालय (खरपुडी), पो.बॉक्स क्र.४५, जालना ४३१ २०३. | ११९६० | अ (२०१६-१७) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. ओ. डी. कोहीरे | ०२४८२-२३२७७५ ७३५००१३१६० फॅक्स- ६९५७४९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ५५. | कृषी महाविद्यालय, तोंडापूर, पो.वारंगफाटा ता.कळमनुरी जि.हिंगोली ४३१७०१. | १११६१ | ब (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. एन. डब्ल्यु. माळोदे | ०२४५५-२९११९३<br>९६५७९३६७३६<br>फॅक्स-२९११९३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५६. | वसंतराव नाईक ग्रामीण कृषी महाविद्यालय, नेहरुनगर, नागलगांव, ता.कंधार जि.नांदेड ४३१ ७४२. | १११६२ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. के. एस. कुलथे | ०२४६६-२०२०२०<br>९४०४५०२७३१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५७. | नेताजी सुभाषचंद्र बोस कृषी महाविद्यालय, मरखेल, ता. देगलूर, जि. नांदेड ४३१ ७१७ | ११२६२ | ब (२०१६-१७) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. एम. आर. मुळे | ०२४६३-२५६६६६<br>७५०७०२५४०९ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५८. | कृषी महाविद्यालय, सेलू, जि. परभणी ४३१५०३. | ११२६६ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. काकडे | ०२४५१-२२२७११<br>९८६०४८९३०३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ५९. | कृषी महाविद्यालय, पाथ्री, जि. परभणी ४३१५०३. | ११२६७ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | डॉ. डी. एन. हेडगिरे | ९८५०९४१३४० | नाही | नाही |
| ६०. | कृषी महाविद्यालय, खंडाळा, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद ४२३ ७०३. | ११२६८ | क (२०१५-१६) | वनामकृवि | १२० | १२ | २४ | श्री. टी. बी. नागरे | ९७६७७३४२३३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ६१. | एमजीएम कृषी महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद | ११२७३ | अ (२०१६-१७) | वनामकृवि | १२० | १२ | १२ | डॉ. व्ही. एस. शिंदे | ९८९०८५५००३<br>०२४०-२४७२२०२ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६२. | कै. अंबादासराव वरपूडकर कृषी महाविद्यालय, वरपूड, पो. मिरखेल, ता.जि.परभणी | ११२७९ | क (२०१५-१६) | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. ए. ए. चव्हाण | ०२४५२-२९१९९९<br>९४०४०४५५५५ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६३. | कृषी महाविद्यालय, रंगनाथ महाराज विश्रांती मठ, नाव्हा, ता.जि. जालना | ११२८९ | ड (२०१५-१६) | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. आर. ए. पाटील | ०७२६४-२४२०६३<br>९८९०८७४४६८<br>फॅक्स- २४३२७८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६४. | सौ. के.एस.के. उर्फ काकू कृषी महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड-४३११२२ | ११२९३ | क (२०१५-१६) | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. डी. ए. शिंदे | ९४२२७४३५७२<br>०२४४२-६४४७०१ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६५. | डॉ. गंगाधर पाथ्रीकर कृषी महाविद्यालय, पाथ्री, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद | ११२९९ | २०१५-१६ पासून सुरु | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. ए. आर. कराळे | ९८२२९९४८६६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६६. | कृषी महाविद्यालय, आळणी (गडपाटी), ता.जि. उस्मानाबाद | ११३०० | २०१५-१६ पासून सुरु | वनामकृवि | ६० | ६ | १२ | डॉ. एम. जी. उमाटे | ०२४७२-२८४३८८<br>७५८८५३५६५८<br>फॅक्स- २८४३८८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६७. | कृषी महाविद्यालय, सरळगाव ता.मुरबाड जि.ठाणे ४२१ ४०१. | १११६३ | ब | डॉ.बासाको कृवि | १२० | १२ | २४ | डॉ.एस. सी. सरोदे | ०२५२४-२४०७७०<br>फॅक्स- २४०७७०<br>९८५०३६०१२६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ६८. | छत्रपती शिवाजी कृषी महाविद्यालय, किर्लोस, सिंधुदुर्ग नवनगर विकास प्राधिकरण, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग ४१६८१२. | ११९६४ | क | डॉ.बासाको कृवि | ९० | ९ | १८ | श्री. डी. एम. गोलनवनकर | ०२३६२-२२८९०९ फॅक्स- २२८१२० ९४२१२६६६०७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ६९. | गोविंदरावजी निकम कृषी महाविद्यालय, मांडकी पालवन, ता.चिपळूण जि.रत्नागिरी ४१५ ६४१. | ११९६५ | अ | डॉ.बासाको कृवि | १८० | १८ | २४ | प्रा.एस. आर. दिवाळे | ०२३५५-२३३००५ २३३००५ ९४२१२३०९१५ फॅक्स- २३३२३६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ७०. | शरदचंद्रजी पवार कृषी महाविद्यालय, खरवते दहिवली ता.चिपळूण (सावर्डे) जि.रत्नागिरी ४१५६०६. | ११९६६ | अ | डॉ.बासाको कृवि | १८० | १८ | २४ | डॉ. एस. ए. पाटील | ०२३५५-२७३६४० ९४२३२९६८६८ फॅक्स- २७३६४३ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ७१. | कृषी महाविद्यालय, सांगुळवाडी ता.वैभववाडी जि.सिंधुदुर्ग ४१६८१०. | ११९६७ | ब | डॉ.बासाको कृवि | १२० | १२ | २४ | डॉ. पी. डी. चेंडगे | ०२३६७-२३७३७० ९९२२१२३६०८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ७२. | कै.राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, आय.टी.आय. जवळ, मु.पो.फोंडाघाट, ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०१. | ११९६८ | ब | डॉ.बासाको कृवि | १२० | १२ | २४ | श्री. आर. एन. भिसे | ०२३६७-२४५४१० ९४२१३२७६६९ फॅक्स- २४५३५७ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | वर्गवारी | विद्यापीठाचे नाव | पहिल्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता | पहिल्या वर्षासाठी १० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी / फॅक्स | वसतीगृह सुविधा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पुरुष | स्त्री |
| ७३. | कृषी महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड | ११२९० | क | डॉ.बासाको कृवि | ६० | ६ | १२ | डॉ. आर. डी. मुरुडकर | ९५५२७२९९३४<br>८६०५५६४६९४ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | **एकूण** | | | | **७७७०** | ७७७ | १४९४ | | | | |

* शासन निर्णय, अल्पसंख्याक विभाग, क्र. अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२७/५/२०१३ नुसार ५१ टक्के जागा महाविद्यालयस्तरावर भरण्यात येतील.

टीपः- (१) गुणवत्ता, आरक्षण आणि संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय यांनी ठरविलेल्या प्रमाणकानुसार वसतीगृह सुविधा पुरविली जाईल.

(२) महाविद्यालयांची प्रवेश क्षमता कमी किंवा अधिक करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

(३) दुसऱ्या वर्षाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता विचारात घेऊन दुसऱ्या वर्षासाठी २० टक्के अतिरिक्त प्रवेश क्षमता दर्शविण्यात आली आहे.

(४) उक्त महाविद्यालयांपैकी कोणत्याही महाविद्यालयामध्ये कोणत्याहीवेळी प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

**३. उमेदवारांसाठी सूचना :**

३.१ **प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

३.२ (i) प्रत्येक अर्जदाराने **फक्त एकच प्रवेश अर्ज** 'केटीपीएल'च्या **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. **उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा परिपूर्ण भरलेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.**

(ii) **प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने कृषी परिषद, कृषी विद्यापीठ किंवा मे. केटीपीएल, पुणे यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

(iii) **संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.** मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिकृत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन केल्यास त्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(iv) **खुल्या उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.१०००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.५००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

३.३ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या मूळ प्रती स्कॅन करून पुढील क्रमाने त्याच्या लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(अे) **पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणी पत्रक.**

(बी) ज्या कृषी तंत्रनिकेतनमध्ये शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ते कृषी तंत्रनिकेतन **सोडल्याचा दाखला.**

(सी) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा / कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.

(डी) **सन २०१५-२०१६ किंवा २०१६-२०१७ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना

**<u>परिशिष्ट 'सी'</u>** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(ई) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एफ) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १ एप्रिल,२०१७ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले '<u>उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.</u>**

(जी) महाराष्ट्र राज्यातील <u>जिल्हा पुनर्वसन अधिकारी</u> <u>किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी</u> (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **<u>प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.</u>**

(एच) प्राधिकृत समादेशकाने दिलेले **<u>राष्ट्रीय छात्र सेना</u> 'बी'** किंवा **'सी'** हवाई दल/ नौदल / स्थलसेना विभागाचे **<u>प्रमाणपत्र.</u>**

(आय) (i) **इ.११ / १२ वी / कृषी तंत्रनिकेतन मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा/ खेळ /** वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व **स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व** करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले **<u>जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र</u>.**

(ii) **नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांबाबत भारतीय क्रीडा महासंघाच्या (SGFI)** वतीने दिलेले आणि **जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त**

**(iii) क्रीडा संघटनेमार्फत दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

(जे) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र.**

(१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे.

(२) **स्वातंत्र्यसैनिकाने या सवलतीचा उपयोग यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी केलेला नाही** आणि आता उपयोग केल्यानंतर तो पुढे करणार नाही.

वरील मुद्यांसंबंधात काही शंका, तक्रारी, अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयाचा संदर्भ घ्यावा.

(के) **सक्षम प्राधिका-याने दिलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र.**

(एल) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(एम) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(एन) शारीरिकदृष्टया अपंगत्व प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **अपंगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र** जोडावे.

(ओ) **आर्थिकदृष्टया मागास वर्गातील उमेदवारांनी संबंधित तहसीलदारांचे दि.१ जानेवारी,२०१७ रोजी किंवा त्यानंतर दिलेले** आर्थिक मागास वर्गाचे प्रमाणपत्र. (सदरची तरतूद फक्त केंद्रीय प्रवेश पध्दतीने कायमस्वरुपी विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.)

३.४ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी संकेतस्थळावर अपलोड केलेला प्रवेश अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.५ मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र.६३/२०१४ बाबत दि.२४.१२.२०१४ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने तसेच याबाबत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या अधीन राहून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जात वैधतेबाबत खालील बाबींची पूर्तता करावी.

(१) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्राची मूळ प्रत स्कॅन करून अपलोड करावी **किंवा**

(२) ज्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडे 'जात वैधता प्रमाणपत्र' नाही व जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, अशा उमेदवारांनी जात पडताळणी समितीकडे प्रकरण सादर केले असल्याची अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीची पोहोच पावती स्कॅन करून अपलोड करावी. व **परिशिष्ट- 'डी '** येथील हमीपत्र स्कॅन करून अपलोड करावे.

अनसूचित जमातीचे जात प्रमाणपत्राबरोबरच उक्त दोन्हीपैकी एकही कागदपत्र सादर न करणारे उमेदवार अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेशास अपात्र असतील.

३.६ **स्कॅन करून अपलो**ड **केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.**

उक्त अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'ई' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.

३.७ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

(अ ) **सक्षम प्राधिका-याने दिलेले <u>अधिवास प्रमाणपत्र</u> किंवा <u>जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा / कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र</u> किंवा <u>सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखल्याची प्रत संकेतस्थळावर अपलोड के</u>ली नसल्यास.**

(ब) **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे <u>सध्याचे छायाचित्र</u> व स्वतःची स्वाक्षरी** संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

(क) **पात्रता परीक्षेचे <u>गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या मूळ प्रती संकेतस्थळावर अपलोड केल्या</u> नसल्यास.**

(इ) **<u>कृषी तंत्रनिकेतन सोडल्याच्या दाखला</u> संकेतस्थळावर अपलोड केला नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ **कृषी तंत्रनिकेतन** सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(फ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **<u>नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'</u> संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

(ग) **प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

(घ) **संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणा पत्र जोडले नसल्यास.**

३.८ **गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम (Merit Position) ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) कृषी तंत्रनिकेतन परीक्षेतील उच्चतम गुणांची टक्केवारी.

(ब) कमीत कमी प्रयत्नांमध्ये कृषी तंत्रनिकेतन परीक्षा उत्तीर्ण.

(क) इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी.

(ड) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(इ) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

३.९ **प्रवेश अर्ज व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर टपालाने / कुरीअरने / हातबटवडयाने कोणतीही <u>अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.</u>**

३.१० **उमेदवारांनी** त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी **प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये जास्तीत जास्त विकल्प द्यावेत.** त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या सांकेतांकांचा वापर करावा. **प्रवेश अर्ज पूर्णपणे अपलोड झाल्यानंतर प्रवेश अर्जामध्ये / <u>विकल्पामध्ये बदल करता येणार नाही.</u>**

३.११ (i) **उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती द्यावी.**

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास, त्याबाबत 'केटीपीएल' किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.१२ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर **गुणवत्ता यादीतील स्थान, उमेदवाराने दिलेले विकल्प, लागू असलेले आरक्षण आणि उपलब्ध जागा विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.**

३.१३ उमेदवाराने दिलेल्या **विकल्पानुसार प्रथमतः राज्यस्तरावरील ('एम' कोटा) उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१४ प्रवेशासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'एम्' कोटा व 'यु' कोटयातील यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **www.mcaer.org** & **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

३.१५ प्रवेशोच्छुक उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'एफ'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१६ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(१०३)/११)/मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाकडे स्वच्छताविषयक बाबींसबंधी **परिशिष्ट 'जी '** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहिती पुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ कृषी परिषद, पुणे ही राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता 'केटीपीएल', पुणे यांच्यामार्फत प्रवेशप्रक्रिया राबवील.

४.३ कृषी तंत्र निकेतन उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना कृषी पदवी [B.Sc. (Agri.)] अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशासाठी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त जागा असतील.

४.४ कृषी तंत्र निकेतन उत्तीर्ण असलेल्या (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणधारक) उमेदवारांना कृषी पदवी [B.Sc. (Agri.)] अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात प्रवेशासाठी प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागा असतील.

४.५ (i) **प्रथम ३० टक्के जागा महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी खुल्या असतील ('एम्' कोटा) आणि**

(ii) **नंतर ७० टक्के जागा, या, उमेदवार ज्या विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील कृषी तंत्र निकेतनामधून अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी असतील ('यु' कोटा)**

४.६ पदवी अभ्यासक्रमासाठी सर्व प्रवेश **गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील.**

४.७ **<u>maha-agriadmission.in</u>** किंवा **<u>www.mcaer.org</u> या संकेतस्थळावर सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल**. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील. **उमेदवारांना टपाल किंवा दूरध्वनीद्वारे त्यांच्या गुणवत्तेबाबत कळविले जाणार नाही.**

४.८ गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यांच्या तक्रारी, प्रवेश अर्ज नोंदणीच्यावेळी त्यांना पुरविण्यात आलेल्या 'लॉगइन् आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन' सादर कराव्यात. **या मुदतीत उमेदवाराचा तक्रार अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची/तिची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

४.९ **उमेदवाराने त्याचा 'लॉग इन आय्डी' व 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन <u>प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. गंभीर वैद्यकीय कारणास्तव उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास परिशिष्ट- 'पी' येथील प्राधिकार पत्राप्रमाणे उपस्थिती नोंदवावी. अन्यथा असा उमेदवार प्रवेशासाठी अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश आपोआपच रद्द झाला आहे, असे समजण्यात येईल.</u>**

४.१० (अ) प्रवेश माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

**(ब) प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने <u>खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे,</u> असे आढळून आल्यास <u>असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.</u>**

(क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

(ड) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश महासंचालक, कृषी परिषद हे रद्द करतील.

४.११ (i) **उमेदवाराचा प्रवर्ग आणि / किंवा अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे,** प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या **छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, असा उमेदवार प्रवेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.**

(ii) सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी याबाबतची वस्तुस्थिती 'केटीपीएल' आणि कृषी परिषद यांना **ई-मेल, दूरध्वनी तसेच फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.**

(iii) 'केटीपीएल' द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित करण्यात येईल आणि सदर उमेदवार त्याच्या सुधारित **गुणानुक्रमानुसार पुढील प्रवेश फेरीद्वारे प्रवेशास पात्र राहील.**

४.१२ (i) एखाद्या उमेदवाराला प्रवेशाबाबत तक्रार करायची असल्यास, **संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषी परिषदेचे महासंचालक** यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.

(ii) अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

४.१३ पदवी अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

४.१४ **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, त्याने / तिने **संकेतस्थळावर लॉग-इन मध्ये डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारावा.**

४.१५ **एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही किंवा प्रवेश वाटपानुसार प्रवेशही घेतला नाही तर त्याचा / तिचा 'जागेवर प्रवेश फेरी' या फेरीखेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

४.१६ **जे विद्यार्थी थेट दुसऱ्या वर्षात प्रवेशित होतील, अशा विद्यार्थ्यांचा पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.**

४.१७ प्रवेशित विद्यार्थी पुढील प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेशास पात्र असणार नाही. मात्र प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास / प्रवेश वाटप नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

४.१८ **प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा :**

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

४.१९ प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **maha-agriadmission.in** व **www.mcaer.org** या संकेतस्थळांवर उपलब्ध राहील.

४.२० महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'एच'** येथे दिलेल्या आहेत.

४.२१ उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | आरक्षण संवर्ग | टक्केवारी | अ. क्र. | इतर आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ | (८) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ | (९) | अपंग (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ३ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ | (१०) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ | (११) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपीडित. | ४ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ | (१२) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ | (१३) | महिला | ३० |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ | | | |
| | एकूण | ५० | | | |

**टीप-**

(१) अ.क्र. ८ ते १३ हे आरक्षण खुला व आरक्षण संवर्गामध्ये गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील.

(२) इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १३ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक **परिशिष्ट 'आय'** येथे जोडले आहे.

(३) 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

(४) घटनात्मक आरक्षणाबाबतचे प्रचलित नियम व अन्य आरक्षणे विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू आहेत. ('ओएस' प्रवर्ग वगळून)

(५) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. पंदेकृवि-१००७/प्र.क्र.१६७७/७-अे, दि.४/१२/२००८ अन्वये **कृषी महाविद्यालय, सोनापूर जि.गडचिरोली येथे ८० टक्के जागा आदिवासी उमेदवारांसाठी राखीव आहेत.** (प्रत **परिशिष्ट 'जे'** येथे जोडली आहे.) याचप्रमाणे **कृषी महाविद्यालय, नंदूरबार** येथे जागांच्या आरक्षणाची तरतूद आहे.

(६) महाविद्यालयनिहाय जागांचे वाटप करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णय **परिशिष्ट- 'अे'** येथे दर्शविण्यात आला आहे.

## ६. गुणाधिभार / अतिरिक्त गुण

पात्रता परीक्षेमध्ये मिळविलेल्या **एकूण गुणांची टक्केवारी मूळ गुण म्हणून (Points) धरण्यात येईल व** प्रवेशासाठी उमेदवारास खालील प्रमाणे गुणाधिभार / अतिरिक्त गुण देण्यात येतील.

| | |
|---|---|
| (१) राष्ट्रीय छात्रसेना 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्र /हवाईदल /सेना/नौदल विभागाचे प्रमाणपत्र /राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले प्रमाणपत्रधारक. | **२ पॉईंटस्** |
| (२) जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धामध्ये सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्र धारक. | २ पॉईंटस् |
| (७) वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | **२ पॉईंटस्** |

## ७. शिक्षण पध्दती :

- राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.

- शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्यान, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.
- विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- बी.एस्सी. पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारतीय कृषी शिक्षण व संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या चौथ्या अधिष्ठाता समितीच्या अहवालाच्या शिफारशीनुसार सातव्या सत्रांतर्गत दुसऱ्या रचनापरिमाणानुसार ग्रामीण कृषी कार्यानुभव (ग्राकृकार्या.) पूर्ण करावा लागतो.
- चौथ्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार रोपण प्रशिक्षण / Hands on training इतर विद्याशाखांमधून सातव्या सत्रांतर्गत पूर्ण करावे लागते.
- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून पहिल्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी व प्रात्याक्षिक परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येकी किमान ५५ टक्के गुण अनिवार्य असतात. तसेच त्या त्या विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये प्रत्येकी किमान ४० टक्के गुण अनिवार्य असतात.
- पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कालमर्यादा ८ वर्ष असून यापेक्षा १ वर्ष अधिक कालावधी वाढवून द्यावयाचा झाल्यास विद्यार्थ्याच्या गंभीर कारणाबाबत शहानिशा करून संबंधित कृषी विद्यापीठाच्या विद्या परिषदेकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. अशी कालमर्यादा वाढवून दिलेल्या विद्यार्थ्यास वसतीगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. जागा रिक्त असल्यास देण्यात येईल.
- शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.
- भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने शिफारशीत केलेले नियम प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू राहतील.

## ८. नोंदणी

प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते आणि सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांचे कार्यालयात विद्यार्थी शुल्क भरतात .

## ९. वैद्यकीय तपासणी

- प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे. थेट द्वितीय प्रवेशास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तिसरे सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.
- विद्यापीठ/ सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. विद्यार्थी मार्गदर्शन पध्दत

सर्व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक तथा इतर कार्यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन पध्दत अवलंबिली जाते. यामुळे त्याचा वैयक्तिक विकास होतो. विद्यार्थ्याचा समुपदेशक (पाल्य प्राध्यापक) विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी जागरुक असतो.

## ११. उपस्थिती

- प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.

❖ **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).

❖ अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## १२. शैक्षणिक सहल.

पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महाविद्यालयात निधी उपलब्ध झाल्यास, खालील प्रमाणे शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात.

(१) व्दितीय वर्ष - महाराष्ट्र राज्य

(२) तृतीय वर्ष - दक्षिण भारत

(३) चतुर्थ वर्ष - उत्तर भारत

## १३. खेळ आणि इतर कार्यक्रम.

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १४. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी काही महाविद्यालयांमध्ये वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. घटक महाविद्यालयात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे बंधनकारक किंवा आश्वासित नाही.

## १५. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.

निरनिराळया पदवी परीक्षांमधील उच्चतम गुणवत्ताधारक पदवी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

## १६. शिष्यवृत्ती आणि सवलती.

- घटक व संलग्न विना अनुदानित महाविद्यालयातील आरक्षित जागांवरील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार भारत सरकार शिष्यवृत्ती,
- आर्थिकदृष्टया मागास घटकाच्या विद्यार्थ्यास फ्री शिप,
- भारत सरकारची राष्ट्रीय कर्ज शिष्यवृत्ती,

- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता व साधने भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच
- मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, गुणवत्ता व साधने शिष्यवृत्ती (महाराष्ट्र शासन)

इत्यादी शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

## १७. वर्तणूक आणि शिस्त

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२३)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००१ रोजी दिलेले आदेश** आणि डॉ.राघवन समितीच्या अहवालाच्या आधारे (डी.क्र. ३७०/०४/XI-अे, दि.२६/०२/२००९) व कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी 'रॅगिंग विरोधी कायदा, १९९९ मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **'<u>परिशिष्ट के</u>'** येथील हमीपत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १८. शुल्क ¥

| अ. क्र. | बाब | पदवी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | |
| १ | घटक व अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | ६००० | ६००० |
| | विना अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | २२५०० * <br> ३७५०० ** | २२५०० * <br> ३७५०० ** |
| २ | नोंदणी शुल्क | ४०० | ४०० |
| ३ | पात्रता शुल्क# | ४०० <br> ८०० ⊗ | -- |
| ४ | महाविद्यालय तारण धन (caution money) | २०००© | -- |
| ५ | ग्रथांलय शुल्क | ८०० | ८०० |
| ६ | विद्यार्थी परिषदेच्या विविध बाबींसाठीची वर्गणी | | |
| | एक) खेळ, जिमखाना व इतर गतीविधी | १००० | १००० |
| | दोन) विद्यार्थी सहकारी संस्था (भांग भांडवल +सभासद शुल्क) | २०० # | -- |
| | तीन) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ | ४०० | -- |
| | चार) महाविद्यालय नियतकालिक | ४०० | -- |
| | पाच) अश्वमेध क्रीडा शुल्क | ५० | -- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- |
| ८ | ओळखपत्र | १०० # | -- |
| ९ | विद्यार्थी सहायता निधी | २०० # | -- |
| १० | श्रेणी पत्रिका शुल्क | २०० | २०० |
| ११ | परीक्षा शुल्क | ३२०० | - |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- |
| | एकूण (अ) | १५६५० + [४०० ⊗ / २२५००* / ३७५००** ] | ८४०० + [२२५००* / ३७५००** ] |
| | **(ब) वसतिगृह** | | |
| १ | वसतिगृह हमी अनामत | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत आकार | ३००० | ३००० |
| ४ | खाणावळ अनामत रक्कम | २०००© | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० |
| | एकूण (अ+ब) | २६६५० + [२०० ⊗ / २२५००* /३७५००** ] | १४४००+ [२२५००* /३७५००**] |

¥ प्रस्तुत शीर्षांतर्गत दर्शविण्यात आलेले शुल्क हे कृषी परिषदेच्या मान्यतेनुसार बदलण्यात येईल.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

⊗ पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळात एकदाच भरावयाचे आहे. हे शुल्क RAWE / RHWE / RFWE इत्यादी उन्हाळी प्रशिक्षण किंवा कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारले जाणार नाही.

**टीप-**

१. गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.
२. एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क आठव्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी ज्या त्या विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.
३. महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित केलेल्या नियमाप्रमाणे दिल्या जातील.
४. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबंधित विषयाकरिता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबंधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.

## १९. प्रवेश कार्यक्रम

कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठी पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०१७-१८ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | **कार्यक्रम** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | १५/०५/२०१७ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | २४/०५/२०१७ |
| ३. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ३१/०५/२०१७ |
| ४. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | ०३/०६/२०१७ |
| ५. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०६/०६/२०१७ |
| | **थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०८/०६/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १०/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | १३/०६/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | १५/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ८. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | १७/०६/२०१७ |
| ९. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एल'** येथील कार्यपध्दतीनुसार व **परिशिष्ट 'एम'** मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा'वर फक्त) | १९ ते २३/०६/२०१७ |
| १०. | दुसऱ्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १५/०६/२०१७ |
| | **पहिल्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | |

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| ११. | मुद्दा क्र. ४.१७ विचारात घेऊन पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी | २६/०६/२०१७ |
| १२. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २८/०६/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ३०/०६/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| १३. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ०३/०७/२०१७ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०५/०७/२०१७ (सायं. ५.३० पर्यंत) |
| १४. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | ०७/०७/२०१७ |
| १५. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एन'** येथील कार्यपध्दतीनुसार व **परिशिष्ट 'एम'** मध्ये नमूद करण्यात आलल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा'वर फक्त) | १० व ११/०७/२०१७ |
| १६. | पहिल्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०२/०८/२०१७ |

**टीप -**

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी प्रवेश फेरीच्या कालावधीत कामकाज चालू राहील.**

(२) वर अधिसूचित केल्याप्रमाणे **प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.**

**२०. 'केटीपीएल' चे संकेतस्थळ 'maha-agriadmission.in' दि. १५ मे,२०१७ पासून कार्यरत राहील.**

**मा. महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**डॉ. एस. जे. काकडे**
**संचालक (शिक्षण)**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे-४११ ००७.**

## प्रवेशाकरिता महाविद्यालयस्तरावर तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (१) | **महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा / कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** | |
| (२) | **कृषी तंत्रनिकेतन गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. | |
| (३) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. | |
| (४) | **कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. | |
| (५) | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात प्रमाणपत्र.'** | |
| (६) | अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारासाठी राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले **'जात वैधता प्रमाणपत्र'** अथवा अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीच्या पोहोच पावतीची छायाप्रत व **परिशिष्ट- 'डी'** येथील हमीपत्र. | |
| (७) | दि. **१ एप्रिल,२०१७ किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दाखल केला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (८) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावरील प्रतिज्ञापत्र.** | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |
| (९) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (१०) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** **[विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.]** | |

| अ.क्र. | **प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील** | **आहे (√) / नाही (×)** |
|---|---|---|
| (११) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / पुनर्वसन अधिकाऱ्याने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (१२) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०१५-१६ किंवा २०१६-१७ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१३) | **राष्ट्रीय छात्रसेने**चे (एनसीसी) **'ब' किंवा 'क' प्रमाणपत्र** किंवा समादेशक अधिकाऱ्याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) प्रमाणपत्र (अकरावी किंवा बारावी किंवा तंत्र निकेतनमध्ये उत्तीर्णतेच्या कालावधीतील). | |
| (१४) | अर्जदाराने महाविद्यालयात इयत्ता **अकरावी आणि / किंवा बारावी किंवा कृषी तंत्रनिकेतन मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र**. | |
| (१५) | कनिष्ठ महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे **'एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) प्रमाणपत्र'**. | |
| (१६) | इ.११ / १२ वी किंवा कृषी तंत्रनिकेतन मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र. | |
| (१७) | आर्थिकदृष्टया मागास वर्गातील उमेदवारांकडे संबंधित तहसीलदारांचे दि.१ जानेवारी,२०१७ रोजी किंवा त्यानंतर दिलेले **'आर्थिक मागास वर्गाचे प्रमाणपत्र'**.<br>(सदरची सवलत फक्त केंद्रीय प्रवेश पध्दतीने विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस लागू आहे.) | |
| (१८) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (१९) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'जी'** मधील हमीपत्र. | |
| (२०) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'ई' मधील स्वयंघोषणा पत्र. | |